संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# रिझर्व्ह बँकेच्या लबाडीला चपराक

**एकीकडे** माहिती अधिकार हा सामान्य माणसाच्या हातातील लोकशाहीने दिलेला सर्वात मोठा आधार आहे. असे वारंवार बिंबवले जात असताना दुसरीकडे याच माहिती अधिकाराला धाब्यावर बसवून ती माहिती नाकारण्याचा उद्योग जेव्हा केला जातो. तेव्हा त्यातली लबाडीदेखील स्पष्ट होते. रिझर्व्ह बँकेसारखी देशातील सर्वात मोठी मध्यवर्ती संस्था देशातील कर्जबुडव्यांची नावे द्यायला नकार देते. माहिती अधिकाराच्या खाली या कर्जबुडव्यांची यादी मिळावी असा अर्ज रिझर्व्ह बँकेकडून फेटाळला जातो आणि त्यात गोपनीयतेचा नियम दाखवला जातो तेव्हा सरकारी यंत्रणांच्या दुटप्पीपणाचे प्रदर्शन मांडले जाते. आता जेव्हा ही बाब सर्वोच्च न्यायालयात गेली आणि माहिती अधिकाराखाली सहज देता येऊ शकणारा हा तपशील रिझर्व्ह बँक का दडवत आहे असा प्रश्न केला गेला त्यावेळी सर्वोच्च न्यायालयाने अतिशय कडक शब्दामध्ये रिझर्व्ह बँकेला समज दिली आहे. कर्जबुडव्यांची ही यादी तर रिझर्व्ह बँकेने दिली तर पाहिजे. त्याशिवाय ज्या नियमाखाली अशा प्रकारची माहिती नाकारली गेली तो नियम दुरुस्त करण्याचाही आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. आता नाक घासत रिझर्व्ह बँकेला देशाची लूट करणाऱ्या कर्जबुडव्यांची यादी जाहीर करावी लागेल. आधी माहिती नाकारली जाणे ती देताना टाळाटाळ करणे किंवा नको त्या नियमांचे बुजगावणे पुढे केले जाणे त्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने आदेश देणे या सगळ्या गोष्टी एका कायदेशीर सोपस्काराचा जरी भाग असला तरी त्या अंतर्गत काही महत्त्वाचे मुद्दे उपस्थित होतात. ज्याची अतिशय कठोरपणे चर्चा व्हायला हवी. खरे तर नियमाप्रमाणे रिझर्व्ह बँकेच्या वार्षिक अहवालामध्ये कर्जबुडव्यांचा सर्व तपशील जाहीर करणे अपेक्षित असते. त्यातही तो दडवला गेला म्हणजेच दिला गेला नाही तो का दिला गेला नाही याबद्दल बँकेला प्रश्न विचारल्यानंतर बँकेने समाधानकारक उत्तरही दिलेले नाही. म्हणजेच केवळ कर्जबुडव्यांना नकळतपणे संरक्षण देण्याचा बँकेचा हेतू दिसून येतो. देशभरातील वेगवेगळ्या बँकांमधून तब्बल साडेतीन लाखकोटींची कर्ज बुडवली गेली आहेत त्याची वसुली करण्याकरिता सरकारने काही नियमात बदल केले. बँकांनी पाठपुरावा करावा आणि विशिष्ट मुदतीनंतर हे कर्ज परत न करणाऱ्यांच्या मालमत्ता जप्त कराव्यात अशी मोठी दुरुस्तीही कायद्यात केली गेली.

### माहिती अधिकाराचा उपयोग काय?

बँकांचा लाखो कोटींचा पैसा या मूठभर कर्जबुडव्यांनी आपल्या तिजोरीत साठवून ठेवला असेल तर त्यांच्याकडून तो वसूल करण्याकरिता कठोर उपाययोजनांची आवश्यकता भासते. कर्जवसुली ऐवजी कर्ज बुडवणाऱ्यांचीच संख्या किंवा रक्कम जास्त होत असेल तर या सार्वजनिक पैशाची अशा प्रकारे उधळण करण्याचा अधिकार बँकांना कोणी दिला असाही प्रश्न निर्माण होतो. सामान्य कर्जदाराच्याबाबतीत याच बँका अतिशय कठोरपणे वागतात. पण अब्जावधीची कर्जे घेऊन कंपन्यांना टाळे ठोकून परागंदा होणाऱ्यांच्या केसालाही धक्का लागत नसेल तर कर्जाच्या नावाखाली ही लूट संगनमताने केली जाते असाच त्याचा अर्थ काढावा लागतो. ही लूट करणारे तथाकथित प्रतिष्ठित कोण आहेत यासाठीच त्यांची नावे जनतेसमोर देशासमोर आली पाहिजेत. उलट रिझर्व्ह बँकेने पुढाकार घेऊन केवळ त्यांच्या वार्षिक अहवालाचेच नव्हे तर देशातील प्रमुख वर्तमानपत्रांमध्ये नावानिशी त्यांची माहिती प्रसिध्द केली पाहिजे. ते न करता एखाद्या व्यक्तीने माहिती अधिकाराखाली विचारलेल्या अर्जालाही रिझर्व्ह बँक केराची टोपली दाखवत असेल तर बँकेलाच तिच्या अधिकारांच्या मर्यादा काय आहेत याची जाणीव करून दिली पाहिजे. ज्यांनी कोणी ही माहिती मागितली होती त्यांचा त्यामागे वैयक्तिक स्वार्थ काही नव्हता. बँकांमधील सार्वजनिक पैसा जर काही मूठभर लोक स्वतःसाठी वापरत असतील तर ते महाभाग कोण आहेत. हे स्पष्ट व्हावे त्यांच्यावर दबाव यावा आणि भविष्यात असे प्रकार घडू नयेत हाच त्यामागचा उद्देश होता. तो समजून न घेता कोणीतरी रिझर्व्ह बँकेच्या अधिकारावर आक्रमण करीत आहे अशी कोल्हेकुई बँकेने केली पण त्या लबाडीसाठी सर्वोच्च न्यायालयाला सणसणीत चपराक हाणावी लागली.

### ते राजकारणी कोण?

प्रदीर्घ काळ लढा देऊन माहितीचा अधिकार प्राप्त करून घेतला गेला. सरकारी कार्यालयातले अनेक व्यवहार गोपनीयतेच्या नावाखाली दडपले जात होते आणि प्रचंड भ्रष्टाचार होत होता. त्याला काही प्रमाणात या माहिती अधिकाराने आळा बसला. कर्ज घ्यायचे आणि ते परत करायचे नाही. किंवा ते वसूल करण्याचा पाठपुरावाही करायचा नाही. हा सगळाच भाग संगनमताचा भ्रष्टाचार आहे म्हणजेच या कर्जबुडव्यांना कोण पाठीशी घालत होते. कोणाच्या दबावामुळे कर्जवसुली झाली नाही हे सगळेच मुद्दे जनतेसमोर यायला हवेत. आता सर्वोच्च न्यायालयाने कर्जबुडव्यांची नावे जाहीर करण्याचा जरी आदेश दिला असला तरी ही कर्जे किती जुनी आहेत आणि ती वसूल करताना काय काय अडचणी आल्या याचाही तपशील देण्यास सांगितले गेले असते तर आणखीनच बरे झाले असते. कारण आतापर्यंतचा अनुभव असा आहे की राजकीय दबावामुळे ही कर्जवसुली होऊ दिली जात नाही आणि बँक अधिकाऱ्यांना खिशात घालून त्याची टाळाटाळ केली जाते. मग त्या बँक अधिकाऱ्यांना किंवा राजकारण्यांना जाब कोणी विचारायचा. माहिती अधिकाराच्या माध्यमातून ही लबाडीसुध्दा लोकांसमोर आणता येऊ शकते. स्वीस बँकेमध्ये ज्यांची खाती आहेत त्यांची नावे केंद्र सरकार जाहीर करणार होते. पण अजूनही त्याची सगळी नावे जाहीर झाली नाहीत. हा देखील राजकीय लबाडीचाच भाग होता. पण रिझर्व्ह बँक ही स्वायत्त संस्था असेल तर तिने राजकारण्यांच्या अशा दबावाखाली येण्याचे काहीच कारण नाही. उलट उर्जित पटेल यांच्या काळात त्या वसुलीसाठी विशेष उपाययोजनाही केली गेली होती.